मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२





# गोरक्षण म्हणजे चिंचोका खेळणं नव्हे!

## आमदार महेश लांडगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अप्रत्यक्षपणे सुनावले

**पिंपरी | प्रतिनिधी**

गोरक्षक धर्माचे रक्षण करीत आहे. गोमातेच्या संवर्धनासाठी काम करीत आहेत. गोरक्षकांवर खोटे केस करण्याचा प्रयत्न कुणी केला. तर आम्ही कदापि सहन करणार नाही. गोरक्षण करणे म्हणजे चिंचोका खेळणं नाही. चुकीच्या पद्धतीने काही लोक प्रशासनासमोर गोरक्षकांबाबत मांडणी करीत आहेत. त्यांनी एकदा गोवंश कत्तलीसाठी घेवून जाणाऱ्या गाडीचा पाठलाग करावा, म्हणजे गोरक्षण काय आहे, हे तुम्हाला समजेल, अशी खणखणीत भूमिका भाजपा आमदार महेश लांडगे यांनी मांडली.

इंदापूर येथे वीर सरदार मालोजीराजे भोसले यांची गढी आणि समाधी येथील अतिक्रमण हटवण्याबाबत सकल हिंदू समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यावेळी उपस्थित हिंदूत्ववादी जनसमुदायाला संबोधित करताना आमदार लांडगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अप्रत्यक्षपणे सुनावले आहे.

तीन दिवसांपूर्वी कुरेशी समाजातील प्रतिनिधींनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. त्यावेळी गोरक्षकांबाबत चुकीची मांडणी केली. त्यावर अजित पवार यांनी "गोरक्षकांना आवर घाला..." अशा सूचना पोलिस प्रशासनाला केल्या. याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यामुळे हिंदुत्ववादी संस्था, संघटना आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजाची सूर आहे. हिंदूत्ववादी सरकार असतानाही गोरक्षकांवर बंदी घालण्याची भूमिका घेतली जात आहे, अशी खंत गोरक्षकांमधून व्यक्त होत होती. दरम्यान, इंदापूरच्या मोर्चामध्ये आमदार लांडगे यांनी "गोरक्षण म्हणजे चिंचोका खेळणं नव्हे.." असे वक्तव्य केल्यामुळे गोसंवर्धन आणि गोरक्षकांच्या मुद्यावरुन दोन 'दादा' पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे आमने-सामने आले आहेत, असे चित्र आहे.



> एखादा जिहादी, कोणी कुरेशी जातो आणि सांगतो.."गोरक्षक आमचे नुकसान करतात". त्यांना काय अडचण आहे. जुन्नरमधील बेकायदेशीर कत्तलखाने आम्ही बंद केले आहेत. गोमातेचे आम्ही रक्षण करणार आहोत. गोरक्षकांवर बंदी घालण्याची भाषा कोणी करु नये. गोरक्षण, लव्ह जिहाद, लॅन्ड जिहाद, धर्मांतर खपवून घेणार नाही. भाजपा महायुती हिंदूत्ववादी सरकार आहे. गोरक्षकांनी घाबरण्याचे कारण नाही.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# सामाजिक उपक्रमांनी निखिल बोऱ्हाडे यांचा वाढदिवस साजरा

## व्याख्यान, रक्तदान वृक्षारोपण,अन् दंतचिकित्सा शिबिरासह अनेक उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, रक्तदान हे सर्व श्रेष्ठ दान या संकल्पनेतून तीनशे जणांचे रक्तदान, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण, गोमातेचे पूजन व गाईंना चारा वाटप,महिला भजनी मंडळाच्या स्पर्धा तसेच प्राध्यापक वसंत हंकारे यांचे न समजलेले आई-वडिल विषयांवरील व्याख्यान, मुख्यमंत्री सहायता कक्षला पन्नास हजाराची मदत अशा विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उपक्रमांनी सामाजिक कार्यकर्ते निखिल बोऱ्हाडे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी आमदार महेश लांडगे, हिंदुत्ववादी समाजप्रबोधनकार संग्राम भंडारे,राष्ट्रीय स्वंयसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यकारिणी सदस्य हेमंत हरहरे, माजी महापौर राहूल जाधव, माजी महापौर नितिन काळजे,माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, मोशी ग्रामस्थ, विद्यार्थी, मित्र परिवार कार्यक्रमा दरम्यान उपस्थित होते.

निखिल प्रामाणिक कार्यकर्ता शंभर टक्के नगरसेवक होणार : आमदार महेश दादा लांडगे यांचा विश्वास

आमदार महेश लांडगे म्हणाले, वसंत हंकारे यांच्या व्याख्यान आई-वडिलांप्रती आदर, सन्मान कसा केला पाहिजे, त्यावर असून, हे व्याख्यान खरंच भावनेला भिडनारे आहे. समाजासाठी काय करता आले पाहिजे, प्रबोधन , चांगले संस्कार समाजापर्यंत पोहचवण्याचे काम केले आहे. असे उपक्रम खरंच विचारपूर्वक निखिल घेतले आहेस. निखिल तुझ्या मनात जे आहे, तेच माझ्या मनात असून, त्याने त्याची काळजी करू नये, माझी जबाबदारी असल्याचे सांगितले. निखिल बोऱ्हाडे यांची समाजासाठीच्या कार्याची धडपड, दांडगा जनसंपर्क अन् प्रामाणिकपणा यामुळे शंभर टक्के निखिल नगरसेवक होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.




मोशी परिसरातील अबालवृद्धांसाठी सातत्याने कार्यरत असलेले निखिल बोऱ्हाडे यांनी रक्ताचे महत्त्व समजून रक्तदान शिबिर घेतले. तीनशे जणांनी एका दिवसात रक्तदान केले. धार्मिक उपक्रमामध्ये भजनी मंडळाच्या स्पर्धा घेतल्या. दंत चिकित्सा शिबिर घेतले. पर्यावरण संवर्धन, संरक्षणासाठी वृक्षारोपण, गोहत्या रोखण्यासाठी जनजागृती अन् गोपूजन, गाईंना चारा वाटप करण्यात आला. व्याख्याते वसंत हंकारे यांच्या व्याख्यानासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

व्याख्याते वसंत हंकारे यांच्या व्याख्यानातून अनेक विद्यार्थीनीच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. समाजप्रबोधन, संस्कार, संस्कृती याबद्दल त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन निखिल बोऱ्हाडे मित्र परिवार यांच्या माध्यमातून करण्यात आला होता.

# महापालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या कामाला गती

## इमारतीचे सद्यस्थितीत 62 टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम देखील प्रगतीपथावर

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड शहरातील नागरिकांना महापालिकेच्या सर्व सुविधा एकाच छताखाली देण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्देशाने उभारण्यात येत असलेल्या पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली आहे. जानेवारी २०२३ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाचे महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. या इमारतीचे सद्यस्थितीत ६२ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम देखील प्रगतीपथावर आहे.



महापालिकेने हा प्रकल्प ३६ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक इमारतीमध्ये महापालिकेची सर्व कार्यालये एकाच ठिकाणी केंद्रीभूत करणे, नागरी सेवा अधिक सुलभ करणे आणि प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे हा मुख्य उद्देश आहे.

महापालिकेच्या नवीन इमारतीचे तळघरातील तीन मजले आणि तिसऱ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम सध्या पूर्ण झाले आहे. पूर्णत्वास आल्यानंतर ही इमारत नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, संग्रहालय, प्रदर्शन हॉल आणि ई-गव्हर्नन्स सेंटर सारख्या अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असणार आहे. ही प्रशासकीय इमारत ८.६५ एकरच्या विस्तृत भूखंडावर उभी राहत असून, एकूण ९१ हजार ४५९ चौरस मीटर बांधकाम क्षेत्रामध्ये विकसित केली जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३१२.२० कोटी खर्च अपेक्षित आहे.

**ग्रीन इमारत**

शाश्वत विकासाच्या दृष्टीने ही इमारत इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंटसाठी ५ स्टार ग्रीन रेटिंग आणि आयजीबीसी प्लॅटिनम रेटिंग मिळवण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात येणार आहे. सौरऊर्जा, पाणी पुनर्वापर प्रणाली आणि ग्रीन स्पेसेस यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे पर्यावरणपूरक वातावरण टिकवून ठेवण्यास देखील मदत मिळणार आहे.

**तळमजल्यावरील महत्त्वाच्या सुविधा :**

वाचनालय : १२५ चौरस मीटर

प्रदर्शन हॉल/संग्रहालय : ३८० चौरस मीटर

बहुउद्देशीय हॉल : ५७० चौरस मीटर

**प्रमुख वैशिष्ट्ये:**

- इमारतीची रचना : ६ ते १८ मजल्यांचे चार विंग, प्रत्येकी ३ तळघरे
- नवीन सुविधा : नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, ई-गव्हर्नन्स सेंटर, ग्रंथालय, क्लिनिक इत्यादी

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमुळे नागरिकांना अधिक सोयीस्कर सेवा मिळतील. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या मदतीने ही इमारत केवळ प्रशासकीय केंद्रच नव्हे, तर शाश्वत विकासाचे प्रतीक ठरेल.
>
> **– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> नवीन प्रशासकीय इमारतीमुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवांचा विस्तार अधिक सुलभ आणि गतिमान होईल. अत्याधुनिक सुविधा आणि एकाच ठिकाणी केंद्रीभूत कार्यालयांमुळे नागरीकांना अधिक जलद आणि प्रभावी सेवा मिळतील. हा प्रकल्प महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा घडवेल.
>
> **– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# विकास आराखड्यावरील हरकतींवर लवकरच सुनावणी

## महापालिकेकडे 49,570 हरकती; किती स्वीकारल्या जातील, किती फेटाळल्या जातील, याकडे लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास आराखड्यावरील (डीपी) हरकती व सूचनांवर सुनावणी घेण्यासाठी राज्य शासनाने प्राधिकृत समिती स्थापन केली. त्याद्वारे लवकरच सुनावणी सुरू होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी घेतलेल्या ४९ हजार ५७० हरकतींपैकी किती स्वीकारल्या जातील, किती फेटाळल्या जातील, याकडे लक्ष लागले आहे.

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी १५ मे रोजी विकास आराखडा स्वीकारून जाहीर केला होता. त्यावर ६० दिवसांत अर्थात १४ जुलैपर्यंत हरकती व सूचना मागवल्या होत्या. त्यातील आरक्षणांबाबत बहुतांश हरकती नोंदवण्यात आल्या आहेत.

यामध्ये निवासी वस्तीतून रस्ता, रस्त्यांच्या आरेखनामध्ये चुका, नदीच्या निळ्या पूररेषेत जुनी बांधकामे, विविध सेवा-सुविधांची आरक्षणे, उच्च क्षमता द्रुतगती वहन मार्ग (एचसीएमटीआर), दफन भूमी, दहन भूमी, कत्तलखाना, कचरा विलगीकरण केंद्र आदी स्वरुपाच्या हरकती व सूचनांची संख्या अधिक आहे. त्या सादर करण्याची मुदत संपून २७ दिवस अधिक झाले आहे. अद्याप हरकती व सूचनांवर सुनावणी सुरू झालेली नाही. त्यामुळे विकास आराखड्यावरील हरकती-सूचनांवर काय निर्णय होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




दरम्यान, विकास आराखड्यावरील हरकती व सूचनांवर सुनावणी घेण्यासाठी राज्य सरकारने समिती नियुक्त केली आहे. त्यांच्याकडून सुनावणीचे वेळापत्रक जाहीर होईल, त्यानुसार सुनावणी सुरू होणार आहे. 'हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी राज्य शासनाने समिती नेमली आहे. ती समिती सुनावणीचे वेळापत्रक लवकरच जाहीर करणार आहे. त्यानुसार सुनावणी प्रक्रिया सुरू केली जाईल', असे महापालिकेच्या नगर रचना विभागाचे उपसंचालक किशोर गोखले यांनी सांगितले.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पाला मिळणार गती

## पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळात फेरबदल

**पुणे | प्रतिनिधी**

प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य सरकारने प्रशासकीय स्तरावर बदल केला आहे. 2019 मध्ये स्थापन झालेल्या विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळामध्ये सरकारने आता फेररचना केली आहे. या निर्णयामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी अधिक कार्यक्षम आणि धोरणात्मक निर्णय घेण्यास मदत होण्याची शक्यता असल्याचे सांगितले जात आहे.

यापूर्वी कंपनीच्या संचालक मंडळामध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या कार्यकारी संचालक आणि वित्तीय अधिकाऱ्यांचा समावेश होता. आता शासनाने हा निर्णय बदलून त्याच कंपनीच्या दोन प्रतिनिधींना संचालक मंडळात समाविष्ट केले आहे. हा बदल प्रशासकीय सुलभतेसाठी आणि निर्णयप्रक्रियेत अधिक स्पष्टता आणण्यासाठी करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीची भूमिका अधिक सक्रिय होण्याची शक्यता आहे.

**कंपनीत सर्वाधिक वाटा 'सिडको'चा!**

नव्या रचनेनुसार, या कंपनीमध्ये एकूण 14 संचालक असतील. यात सिडको, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि एमआयडीसी या प्रमुख सरकारी संस्थांचा समावेश आहे. 2019 मध्येच या संस्थांच्या भागीदारीचा वाटा निश्चित करण्यात आला होता, ज्यात कोणताही बदल झालेला नाही. त्यानुसार या कंपनीमध्ये सर्वाधिक 51 टक्के वाटा हा सिडकोचा, तर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचा 19 टक्के आणि पीएमआरडीए व एमआयडीसीचा प्रत्येकी 15 टक्के हिस्सा निश्चित केला आहे.



### भूसंपादन अन् प्रकल्पाची सद्य:स्थिती

» पुरंदर येथील या आंतरराष्ट्रीय विमानतळाला राज्य सरकारची यापूर्वीच मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळमार्फत या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. एका बाजूला भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. केवळ भूसंपादनावर लक्ष केंद्रित न करता प्रकल्पाच्या व्यवस्थापनावरही सरकारचे समान लक्ष आहे.

---

# प्राणीसंग्रहालयात चितळांच्या मृत्यूमागे 'ओव्हिन हर्पेसव्हायरस-2'

## देशातील पहिले प्रकरण; केंद्र सरकारने राज्यांना तातडीने सावध राहण्याच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज येथील स्व. राजीव गांधी प्राणीसंग्रहालयात अलीकडेच मृत्यू झालेल्या १७ चितळांच्या नमुन्यांमध्ये 'ओव्हिन हर्पेसव्हायरस-२' (OVHV-२) हा जीवघेणा विषाणू आढळून आला आहे. देशात प्रथमच या विषाणूचा प्राण्यांमध्ये शिरकाव झाल्याचे स्पष्ट झाले असून, याबाबत केंद्र सरकारने राज्यांना तातडीने सावध राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या विषाणूचा शोध भोपाळ येथील आयसीएआर संस्थेने दिलेल्या प्रयोगशाळा अहवालातून लागला आहे. मृत चितळांमध्ये 'मॅलिग्नंट कॅटाररल फिव्हर' (MCF) म्हणजेच घातक सर्दी ताप या आजाराचे जनुकद्रव्य आढळले असून, तो प्रामुख्याने ओव्हिन हर्पेसव्हायरस-२ मुळे होतो. मेंढ्या व शेळ्या या विषाणूच्या वाहक असतात. या आजारावर सध्या कोणतीही लस किंवा निश्चित उपचार उपलब्ध नाहीत.




केंद्र सरकारच्या मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाचे उपायुक्त अरुण शर्मा यांनी या विषाणूविरोधात सर्व राज्यांना खबरदारीचे आदेश जारी केले आहेत. राज्यातील पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी देखील सर्व जिल्ह्यांना हे आदेश तातडीने अंमलात आणण्याचे निर्देश दिले आहेत.

### प्राणीसंग्रहालय व पशुपालन संस्थांना केंद्राने पुढील खबरदारीच्या सूचना

» हरीण, काळवीट, याक व गवा या प्राण्यांची विशेष निगराणी ठेवावी.
» मेंढ्या व गुरे एकत्र ठेवली जात असल्यास तेथे विशेष निरीक्षण करावे.
» जैवसुरक्षा नियम काटेकोरपणे पाळावेत आणि प्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवावे.
» सर्व प्राण्यांची नियमित आरोग्य तपासणी व देखरेख करावी.